**सन २०२२-२३ या कालावधीतील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत श्रीराम'स आय.ए.एस., ॲकडमी, नवी दिल्ली येथे संघ लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेच्या संपूर्ण तयारीकरीता (पूर्व, मुख्य परीक्षा व मुलाखत) तयारी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणासाठी इच्छुक गुणवत्ता यादीतील व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांकडून स्व: हस्ताक्षरात सादर करावयाचे हमीपत्र.**

## हमीपत्र

१. मी सत्य प्रतिज्ञेवर सागतो/सांगते की, मी ..................................................................... **संघ लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेच्या संपूर्ण तयारीकरीता (पूर्व व मुख्य परीक्षा, मुलाखत) नामवंत खाजगी व्यावसायिक संस्थेमार्फत दिल्ली येथे जाऊन प्रशिक्षण कार्यक्रमाचा** लाभ घेण्यास इच्छुक आहे.

**२. सदर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या विद्यावेतनासाठी प्रशिक्षणार्थींची उपस्थिती किमान ७५% असणे बंधनकारक आहे. या नियमानुसार मी दिल्ली येथील श्रीराम'स आय.ए.एस., ॲकडमी, नवी दिल्ली येथे प्रवेश घेत आहे व संस्थेमार्फत प्रत्येक महिन्याचे उपस्थिती पत्रक प्राप्त झाल्यावरच माझ्या बँक खाती विद्यावेतनाची रक्कम DBT द्वारे वर्ग करण्यात येईल याची मला कल्पना आहे.**

३. आजारपणाबाबत एक/दोन दिवसाची किंवा दीर्घ कालावधीसाठी किंवा इतर स्पर्धा परीक्षेला जाण्यासाठी संबधित यंत्रणेच्या प्रमुखांना अनुपस्थित राहण्याबाबतची परवानगी घेऊनच प्रशिक्षण कार्यक्रमात अनुपस्थित राहीन. जर याबाबत परवानगी न घेतल्यास माझी रजा अनुपस्थित म्हणून गणली जाईल. याबाबत मी सजग आहे.

४. मी अनुसूचित जमातीचा असून हे असत्य ठरल्यास प्रशिक्षणाचे घेतलेले लाभ मी परत करीन व कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

**५. जर मी खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास माझ्यावर भारतीय दंड संहिता विधान कलम ४२० अन्वये, कारवाई केली जाईल याची मला पूर्णतः कल्पना आहे.**

**६. मी असे प्रमाणित करतो की, वर्ष २०२३-२४ मध्ये पुढील सहा महिने कालावधीत माझी कोणतीही अंतिम परीक्षेचा निकाल /मुलाखतीचा निकाल आणि नियुक्त बाबतचे पत्र येणे प्रलंबित नाही. तसे आढळल्यास त्याबाबतच्या कारवाईस मी पात्र राहील. मी सदर प्रशिक्षण कार्यक्रम प्रवेशापासून सलग १२ महिने कालावधीसाठी पूर्ण करेल.**

**७. मी कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण सोडवायचे असल्यास माझ्यावर प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान प्रशिक्षणाकरिता संस्थेने केलेला खर्च आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेस परत करेल.**

८. मी दिल्ली येथील माझा निवास व्यवस्थेचा पत्ता, निवास व्यवस्थेचा संपर्क इ. माहिती या कार्यालयास कळवेल.

९. सदर स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी व सुरक्षितता मी स्वतः घेईन.

१०. या प्रशिक्षण कार्यक्रमात माझ्याकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही. मी प्रशिक्षणाबाबत सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करीन. माझ्या गैरवर्तणुकीमुळे इतर व्यक्तीला व संस्थेला त्रास होणार नाही याची मी काळजी घेईल. तसेच प्रशिक्षण कालावधीमध्ये धुम्रपान/अंमली पदार्थांचे सेवन, मद्यपान, उद्धट वर्तन असे कोणतेही गैरप्रकार केल्यास माझी निवड रद्द करण्यात येऊन कायदेशीर व दंडात्मक कारवाईस पात्र राहील.

११. प्रशिक्षण काळात प्रशिक्षणाबाबत आढावा, नियंत्रण इ. बाबीविषयी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मधील अधिकारी/कर्मचारी यांना माहिती अवगत करण्याचे तसेच त्यांना सहकार्य करण्याची हमी देतो/देते.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमात निवड झाल्यानंतर........................................................................ या संस्थेत प्रशिक्षण घेण्यास मी तात्काळ रुजू होईल, जर मी दिलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत रुजू झालो/झाले नाही अथवा आपल्या कार्यालयाशी उशिरा रुजू होण्याबाबत संपर्क केला नाही तर माझी निवड रद्द करून माझ्या जागी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्याची निवड करण्यास माझी हरकत राहणार नाही. मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की, सदर हमीपत्रात नमूद सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

फोटो

प्रशिक्षणार्थ्यांची स्वाक्षरी : ................................

प्रशिक्षणार्थ्यांचे नाव: --------------------- ------------------------------- -----------------------------

जमातीचे नाव : ...................................... .......................................

मोबाईल नंबर : .........................................

तालुका : ....................................... जिल्हा : .......................................

आधार कार्ड नंबर : .......................... .......................... .................

कायमचा पत्ता: -----------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------

साक्षीदार :

१. .................................................................. २. ..................................................................

तपासणी अधिकारी नाव व स्वाक्षरी :

................................................................................................................................................................

................................................................................................................................................................

कार्यालयाचा शिक्का :